RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ५०] गुरुवार, डिसेंबर १८, २०२५/अग्रहायण २७, शके १९४७ [पृष्ठे ४ किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ८९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ डिसेंबर २०२५.

### अधिसूचना

**राजकीय पक्ष नोंदणीसंदर्भात हरकती व सूचना मागविणेबाबत.**

क्रमांक-रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.६७/का. ११.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ट' आणि '२४३यक' अन्वये; तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील तरतुदींन्वये अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पावित्र्य राखणे व अशा निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे, पारदर्शकपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्याच्यादृष्टीने राजकीय पक्षांची नोंदणी व संबंधित बाबींची तरतूद त्यात करणे आवश्यक असल्याने, राज्य निवडणूक आयोगाने दि. ०५ मे २०२५ रोजीच्या क्रमांकः रानिआ/रापनों/२०२४/प्र.क्र.२४/का.११ या अधिसूचनेद्वारे 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' हा आदेश निर्गमित केला आहे;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगास उक्त आदेशातील परिच्छेद ७(२) प्रमाणे राजकीय पक्षाची नोंदणी करण्यापूर्वी **महाराष्ट्र शासन राजपत्रात** पक्षाचे नाव, मुख्य कार्यालयाचा पत्ता व त्याचे अध्यक्ष, सचिव / सरचिटणीस, कोषाध्यक्ष / खजिनदार इत्यादींचा अंतर्भाव असलेली अधिसूचना प्रसिद्ध करून सर्वसाधारण जनतेकडून अशा नोंदणीबाबत हरकती मागविणे आवश्यक आहे;

ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** उपरोक्त प्रमाणे अधिसूचना प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, राज्य निवडणूक आयोग अधिसूचनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे राजकीय पक्षाची नोंदणी करण्याकरिता सक्षम राहील;

ज्याअर्थी, उक्त आदेशाच्या परिच्छेद ७ ( ४ ) (ख) प्रमाणे विहित कालावधीत जर कोणतीही हरकत किंवा सूचना प्राप्त झाली, तर तिचा राज्य निवडणूक आयोगाकडून योग्य विचार केला जाईल. विचाराअंती ती अदखलपात्र आढळल्यास फेटाळण्यात येईल व प्रस्तावित राजकीय पक्षाची नोंदणी करण्यात येईल. मात्र जर कोणतीही हरकत किंवा सूचना प्रथमदर्शनी सत्य वाटली, तर त्याबाबत प्रस्तावित राजकीय पक्षाच्या अर्जदारास कळविण्यात येईल आणि त्यावर त्याचे अभिप्राय मागविण्यात येतील किंवा आयोगास वाटल्यास आवश्यकतेप्रमाणे सुनावणी घेण्यात येईल. अभिप्राय प्राप्त झाल्यावर किंवा सुनावणीनंतर गुणवत्तेच्या आधारे आयोग उचित निर्णय घेईल व आयोगाचा निर्णय अंतिम राहील;

ज्याअर्थी, **श्री. अशोक भगवानराव हुड, अध्यक्ष** यांनी, **‘अखिल भारतीय राष्ट्रीय किसान परिषद’** या नावाने राजकीय पक्षाची राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीसाठी अर्ज केला आहे. या प्रस्तावित पक्षाचा तपशील पुढीलप्रमाणे आहेः—

**पक्षाचे नावः** ‘अखिल भारतीय राष्ट्रीय किसान परिषद’

**अध्यक्षः** श्री अशोक भगवानराव हुड

**सचिव :** श्री. विकास संदिपान गिरी

**कोषाध्यक्ष / खजिनदारः** श्री. हरिकिसन भगवानराव हुड

**पक्षाचा मुख्य कार्यालयाचा पत्ता–** मिळकत क्र. ५३०, पाडळी गाजिपुर, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर ४३१ १०५.

आणि ज्याअर्थी, उपरोल्लेखित प्रस्तावित पक्ष हा भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्ष नसल्याने, अशा पक्षासाठी कोणतेही निवडणूक चिन्ह राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

आता त्याअर्थी, सदर अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सदर राजकीय पक्षाच्या नोंदणीबाबत कुणालाही कोणतीही लेखी हरकत असल्यास, ती आयोगाच्या कार्यालयाकडे लेखी स्वरुपात दाखल करावी, असे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र जाहीर करीत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**अश्विनी ल. मांजे**
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Hutatma Rajguru Chowk,
Madame Cama Road, Mumbai 400 032, dated 18th December 2025.

*NOTIFICATION*

Invitation of objections and suggestions on the Registration of Political Party.

No.SEC/RPP-2025/CR-67/D-11. —WHEREAS, under Articles 243K and 243ZA of the Constitution of India and the provisions of the relevant laws governing local self-government bodies in the State, the powers of superintendence, direction, and control of elections to such local bodies are vested in the State Election Commission;

AND WHEREAS, to maintain the sanctity of elections to local self-government bodies and to conduct then in a free, fair, transparent, and efficient manner, it is necessary to provide for the registration of political parties;

AND WHEREAS, the State Election Commission has issued the 'Maharashtra State Political Parties Registration, Regulation, and Election Symbol (Reservation and Allocation) Order, 2025' by notification No.: SEC/PPR-2024/CR-24/D-11, dated 5th May 2025;

AND WHEREAS, in accordance paragraph 7(2) of the said order, prior to registering a political party State Election Commission is required to published in *Gazette of the Maharashtra Government* containing name, address of the party along with name of President, Secretary/ General Secretary, Treasurer of the party along with the address of the party's headquarters and shall invite objections and suggestions from the general public regarding the registration.

NOW THEREFOR, It is necessary for the State Election Commission to publish a notification in the *Maharashtra Government Gazette* before registering a political party, including details such as the party's name, address of the head office, and names of the President, Secretary/General Secretary, Treasurer, etc., and to invite objections from the general public regarding such registration.

AND IT IS HEREBY FURTHER NOTIFIED, that if no valid objections are received by the State Election Commission within 30 days from the date of publication of Notice in the *Maharashtra Government Gazette*, the State Election Commission shall be competent to proceed with the registration in of the political party as proposed;

AND WHEREAS, In accordance with paragraph 7(4)(b) of the said order, if any objections or suggestions are received within the prescribed period, they shall be duly considered by the State Election Commission. After considering such objection of any, if found to be non-cognizable, those shall be rejected and the proposed political party shall be registered, Further, if any objections or suggestions are *prima facie* found to be valid, the Applicant for the proposed political party shall be informed about it and its comments about the same will be called for or if the State Election Commission deems it fit, conduct a having. After receiving the comments or conducting the hearing, the State Election Commission shall make appropriate decision on the merits which shall be final.

WHEREAS, **Shri Ashok Bhagavanarav Hud, President** has submitted an application to the State Election Commission for registration of a political party named **'All India National Farmer Council'** The details of the proposed party are as follows :—

**Name of the Party:** 'All India National Farmer Council'

**President:** Shri Ashok Bhagavanarav Hud

**Secretary:** Shri Vikas Sandipan Giri

**Treasurer:** Shri Harikisan Bhagavanarav Hud

**Head Office Address of the Party:** Property No. 530, Padali Gajipur Tal. Paithan, Dist.Chhatrapati Sambhajinagar 431 105.

AND WHEREAS, the proposed party is not a recognized political party by the Election Commission of India, hence, there is no need to reserve any election symbol for such a party.

NOW THEREFORE, the State Election Commission of Maharashtra hereby notifies that any person having any objection regarding the registration of the said political party, such objection should be submitted to the office of the Commission within 30 days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*.

By the order of the Hon'ble State Election Commissioner,

ASHWINI L. MANJE,
Assistant Commissioner,
State Election Commission, Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.